महिला व बालकल्याण विभाग,
जिल्हा परिषद सांगली

02/2024-2025

निविदा नोटीस क्र.जिपसां/मबाक/लेखा/ई निविदा/2025/1177 दिनांकः-14/02/2025

**सन 2024-25 या वित्तीय वर्षात जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजना ( विघयो ) योजने अंतर्गत सांगली जिल्हयातील ग्रामीण भागातील अनुसूचित जातीतील 6 महिने ते 6 वर्षे वयोगटातील कुपोषीत मुला मुलींसाठी किशोरवयीन मुलींसाठी व गरोदर, स्तनदा मातांना अतिरिक्त आहार पुरविणे-मल्टी मिलेट न्युट्रीशनल कीट पुरविणे"**

सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अंगणवाडी केंद्रामध्ये सन 2024-25 या वित्तीय वर्षात जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजना ( **विघयो** ) योजने अंतर्गत ग्रामीण भागातील अनुसूचित जातीतील 6 महिने ते 6 वर्षे वयोगटातील कुपोषीत मुला मुलींसाठी किशोरवयीन मुलींसाठी व गरोदर, स्तनदा **मातांना** अतिरिक्त आहार पुरविणे-**मल्टी मिलेट न्युट्रीशनल कीट पुरविणे"** हे खालील साहित्य खरेदी करिता ऑनलाईन निविदेद्वारे (दोन लिफाफा) पद्धतीने निविदा मागवीत आहोत.

| अ.क्र | योजनेचे नाव व निधीचा तपशील | खरेदीची अंदाजित रक्कम | निविदा शुल्क फी | बयाना रक्कमम |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 4 | 5 | 6 |
| 1 | जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजना ( **विघयो सन** 2024-25 योजने अंतर्गत ग्रामीण भागातील अनुसूचित जातीतील 6 महिने ते 6 वर्षे वयोगटातील **कुपोषीत मुला मुलींसाठी किशोरवयीन मुलींसाठी व गरोदर, स्तनदा मातांना अतिरिक्त आहार पुरविणे-मल्टी मिलेट न्युट्रीशनल कीट पुरविणे" (मल्टी मिलेट न्युट्रीशनल बिस्किटे 200 ग्राम व मल्टी मिलेट न्युट्रीशनल प्रीमिक्स 300 ग्राम असे दोन्ही मिळून 500 ग्राम कीट )** | 1,00,00,000/- (एक कोटी रुपये मात्र) | 18,000/- | 1,00,000/- |
| | **एकूण** | | | |

**ई निविदा खालील वेळापत्रकाप्रमाणे राबविणेत येणार आहे.**

| अ.क्र | कार्यवाहीचा टप्पा | कार्यवाही बाबतची तारीख | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | ई-निविदा प्रसिध्द करणे / डाऊनलोड करणे | दि.14/02/2025. | 18.50 |
| 2 | ई-निविदा नमुना साहित्य जमा करावयाची अंतिम तारीख | दि.25/02/2025. | 14.15 |
| 3 | ई–निविदा बिड मिटींग तारीख | दि.21/02/2025. | 11.00 |
| 4 | ई-निविदाची अंतिम तारीख | दि.05/03/2025. | 18.00 |
| 5 | ई-निविदेतील तांत्रिक लिफाफा क्र-1 उघडण्याचा दिनांक | दि.06/03/2025. | 17.00 |
| 6 | ई-निविदेतील व्यापारी लिफाफा उघडणेचा दिनांक (शक्य असल्यास) | दि. . / /2025. | |

सदर ई-निविदा जाहिरात सविस्तरपणे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.14/02/2025पासुन प्रसिध्द करण्यात येत आहे.

1. उपरोक्त कामाची निविदा संगणकावर ई निविदा प्रक्रियेव्दारे ऑनलाईन करणेत येईल.याबाबत भविष्य काळामध्ये सर्व सुचना तसेच शुध्दीपत्रके याकामी ऑनलाईन करण्यात येईल.
2. उपरोक्त कामाबाबतची संपुर्ण माहिती वरील प्रमाणे संकेतस्थळावर उपलब्ध असुन ती वर दिलेल्या कालावधीमध्ये डाऊनलोड करुन घेता येईल.
3. कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवणेत आलेला आहे.

Signed by
Sandeep Sambhaji Yadav
Date: 12-02-2025 15:20:34
(संदीप यादव)
**जिल्हा कार्यक्रम अधिकारी(मबावि)**
**जिल्हा परिषद सांगली**

( तृप्ती धोडमिसे ) भाप्रसे
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सांगली**

## महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद सांगली

**सन 2024-25 या वित्तीय वर्षात जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजना ( विघयो ) योजने अंतर्गत ग्रामीण भागातील अनुसूचित जातीतील 6 महिने ते 6 वर्षे वयोगटातील कुपोषीत मुला मुलींसाठी किशोरवयीन मुलींसाठी व गरोदर, स्तनदा मातांना अतिरिक्त आहार पुरविणे-मल्टी मिलेट न्युट्रीशनल कीट पुरविणे"**

**निविदा भरणेबाबत मार्गदर्शक सुचना**

**लिफाफा क्रमांक-1** तांत्रिक लिफाफा — या लिफाफ्यात खालीलप्रमाणे अ,ब व क अंतर्गत कागद पत्रे आवश्यक आहेत.

**लिफाफा क्रमांक-2** दराचा लिफाफा —मल्टी मिलेट न्युट्रीशनल बिस्किटे 200 ग्राम व मल्टी मिलेट न्युट्रीशनल प्रीमिक्स 300 ग्राम असे दोन्ही मिळून 500 ग्राम कीट चे पाकीट या प्रमाणे फक्त एक नग पाकिटाचा सर्व करांसहित व पोहोच करणेसह दर नमूद करावे.

**अ) निविदा फॉर्म फी -** रक्कम रुपये -18000/- ( रुपये अठरा हजार मात्र ) Online E- Payment पध्दतीणे जमा करणे बंधकारक आहे. तसेच त्याबाबतची प्रत ई निविदा जोडणे आवश्यक राहील

**ब) बयाना रक्कम —** निविदा धारकाने सदर निवेदीकामी र रुपये -1,00,000/- (अक्षरी रुपये एक लाख फक्त) Online E- Payment पध्दतीणे जमा करणे बंधकारक आहे. बयाना रक्कम भरनेपासून सूक्ष्म व लघु मध्यम उद्योग विकास अधिनियम 2006 अंतर्गत उत्पादक म्हणून नोदनीकृत असलेल्या सूक्ष्म व लघु मध्यम उद्योगाना मध्यवर्ती भांडार संघटना याच्याकडे नोंदणी झालेल्या उत्पादक, पुरवठादाराला बयाना शुल्क भरणे पासून सूट देनेत आलेली आहे. याबाबत आवश्यक ती कागद पत्रे जोडणे आवश्यक आहे.

**क) ई- निविदा तांत्रिक लिफाफा क्रमांक -1** मध्ये जोडावयाची कागदपत्रे.

1. निवादाधारक जर उत्पादक असेल तर त्याचे उत्पादक असल्याबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
2. निविदाधारकाने उत्पादक असलेबाबतची सक्षमप्राधिका-याचे नोंदणी प्रमाणपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. उत्पादक कंपनीचे व्यापारी चिन्ह (Brand Name) नोंदणीकृत असल्यास तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
3. जर निविदाधारक अधिकृतत विक्रेता/ पुरवठादार असल्यास तसे उत्पादकाचे अधिकृत विक्रेता असल्याचे प्रमाणपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच उत्पादकाचे FSSAI प्रमाणपत्र जोडणेत यावे.
4. उत्पादकाने व वितरकाने अन्न व औषध प्रशासन विभाग (FDA) यांचे कडील उत्पादक व विक्री परवाना प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
5. निविदेमध्ये दर्शविलेल्या **मल्टी मिलेट न्युट्रीशनल किट** (प्रत्येक प्रॉडक्टचे स्वतंत्र) टेस्ट रिपोर्ट (B-1, B-2/G-1,G-2) NABL Scope मध्ये असणाऱ्या Food Testing Laboratory कडील तपासणी अहवाल प्रमाणपत्र तसेच संबंधित लॅबचे NABL असलेबाबतचे सर्टिफिकेट जोडणे आवश्यक आहे.
6. निविदाधारक जर अधिकृत / पुरठादार असेल तर शॉप ॲक्ट नुसार नोंदणी प्रमाणपत्र अथवा सक्षम प्राधिका-याचे नोंदणी प्रमाणपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.
7. निविदाधारकाचे पॅन कार्ड प्रत जोडणे आवश्यक आहे.
8. निविदाधारकाचे जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
9. निविदाधारकाने चालू वित्तीय वर्षात जी.एस.टी. आर 3 बी. भरणा केल्याचे प्रती जोडणे आवश्यक आहे.
10. उत्पादकाने / वितरकाने भारतीय खाद्य सुरक्षा व मानक प्राधिकरण (FSSAI) यांचेकडील उत्पादन व विक्री प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
11. निविदा वेळापत्रकाप्रमाणे दिनांक व वेळेत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून) निविदेतील साहित्याच्या विवरणात नमूद स्पेसिफिकेशन प्रमाणे **मल्टी मिलेट न्युट्रीशनल किट (प्रत्येक प्रॉडक्टसचा स्वतंत्र)** नमुना व तपासणी अहवालल कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे. तसेच नमुना तपासणी करण्यात आलेली प्रयोगशाळा हि NABL प्रमाणित FOOD TESTING LAB असल्याचे प्रमाणपत्र (CERTIFICATION) प्रत तसेच नमुना व प्रमाणपत्र जमा केल्याची पावती ई-निविदेतील कागदपत्रांसोबत Upload करणे अनिवार्य आहे.
12. उत्पादकाचे /वितरकाचे (FSSAI) भारतीय खाद्य सुरक्षा व मानक प्राधिकरण, अन्न सुरक्षा प्रणाली जागतीक प्रमाणन प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
13. निविदाधारकांने उत्पादक संस्थेचे ISO 9001: 2015, ISO 22000:2018 च्या नोंदणीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
14. उत्पादकाचे पर्यावरण व्यवस्थापन प्रणाली प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
15. उत्पादकाचे उत्पादन शाकाहारी असल्याचे अनुपालन प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असून उत्पादक शाकाहारी दर्शविणारे चिन्ह प्रत्येक पाकिटावर नमुद करणे बंधनकारक राहील.
16. उत्पादकाचे सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाचे झेड ब्राँझ प्रमाणपत्र तसेच HACCP प्रमाणपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

17. निविदाधारक उत्पादकाने अन्न सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली व उत्कृष्ट उत्पादन पद्धती प्रमाणपत्र (GMP) जोडणे आवश्यक आहे.
18. निविदाधारकाने मागील 3 वर्षाचे सन 2021-2022, 2022-2023, 2023-2024 या तीन वित्तीय वर्षाचे सनदी लेखापाल यांचे कडील वार्षिक ताळेबंद जोडणे आवश्यक आहे.
19. निविदाधारकाने मागील तीन वित्तीय वर्षाचे आयकर भरल्याचे Assessment Year 2022-2023, 2023-2024, 2024-2025 चे प्रमाणपत्र जोडणे आवश्यकआहे.
20. निविदाधारकाची मागील तीन वर्षामधील (सन 2021-2022, 2022-2023, 2023-2024) मिळुन सरासरी उलाढाल (Turnover) कमीत कमी निविदा रक्कमेच्या 20 टक्के असने आवश्यक आहे. तसेच या बाबतचे सनदी लेखापाल यांचे Turnover प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.
21. निविदाधारकाचे दिनांक 31/3/2025 अखेर व्यवसायकर (Professional Tax ) भरल्याचे प्रमाणपत्र / चलन जोडणे आवश्यक आहे.
22. निविदाधारकाने निविदेमध्ये दर्शविलेल्या स्पेसीफिकेशनप्रमाणे सुक्ष्म पोषकतत्वे असलेल्या मल्टी मिलेट पासून बनविलेल्या प्रॉडक्टसचा निविदा रक्कमे इतका जिल्हा परिषद स्तरावर पुरवठा केलेबाबत अनुभव असने आवश्यक आहे व त्या संबंधी पुरवठा आदेशाचे प्रती तसेच अनुभवाचा दाखला निविदेमध्ये जोडणे बंधनकारक राहील.
23. मल्टी मिलेट पासून बनविलेल्या प्रॉडक्टचा जिल्हा परिषद स्तरावर एकाच वेळेस एकाच पुरवठा आदेशानुसार कमीत कमी निविदा रक्कमेच्या 40 टक्के रक्कमेचा पुरवठा केल्याचा अनुभव असणे बंधनकारक आहे व तशी पुरवठा आदेशाची प्रत व अनुभव दाखला ई-निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.
24. निविदा वेळापत्रकाप्रमाणे विहित कालावधीत निविदेतील स्पेसिफीकेशन प्रमाणे साहित्य नमुन्याचे 2 नग या कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहिल तसेच पोहोच पावती निविदेमध्ये अपलोड करण्यात यावी.
25. निविदाधारक कोणत्याही प्राधिकरणाकडून Black Listed नसल्या बाबत तसेच निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असले बाबत तसेच पुरवठा करावयाचे साहित्य निर्धारीत कालमर्यादेत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे प्रकल्प कार्यालयापर्यन्त पुरवठा करणेस तयार असले बाबत रु 500/- चे स्टॅम्प पेपर वर प्रतिज्ञापत्र निविदेच्या टेंडर आयडी सह जोडावे. तसेच निवेदे सोबत सादर केलेली सर्व कागदपत्रे सत्य असलेबाबत नमूद करणे बंधनकारक आहे त्यानंतर कागद पत्राबाबत काही तफावत आढळल्यास कार्यलयाचा निर्णय अंतिम राहील.
26. निविदाधारक केंद्र व राज्य किंवा जिल्हा परिषद सेवेशी सलग्न किंवा अप्रत्यक्ष संबंधीत नसल्या बाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
27. निविदाधारकाचे विभागास प्राप्त झालेले साहित्याचे नमुने तपासणीसाठी शासकीय प्रयोगशाळा / NABL Scope मध्ये असणाऱ्या Food testing laboratory मध्ये पाठविण्यात येईल त्या तपासणीमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांचेच व्यापारी लिफाफे उघडविण्यात येतील.
28. ई-निविदेत प्राप्त झालेले निविदाधारकांचे नमुना साहित्य तपासणीसाठी पाठविल्यानंतर सदरील लॅबची तपासणी फी निविदाधारकरकांना कार्यालयाकडून कळविण्यात येईल. सदरील फी निविदाधारकाने या विभागाकडून कळविणेत आलेल्या बँक खातेमध्ये जमा करुन पावती महिला व बालकल्याण विभाग जि.प. सांगली यांचेकडे पाठविण्यात यावी, निविदाधारकांचे तपासणी फी जमा केल्याची पावती प्राप्त झालेनंतरच साहित्य तपासणी अहवालामध्ये पात्र झालेल्या निविदाधारकाचेच लिफाफा क्रं 2 उघडण्यात येईल.
29. निविदाधारकांने ई निविदेत सादर केलेले सर्व कागदपत्रे स्वयंसाक्षांकित करुन अपलोड करण्यात यावी. तसेच पत्रव्यवहार करण्यासाठी निविदाधारकांने आपला ई-मेल आयडी देण्यात यावा.

**लिफाफा क्र. (2)-Bid of Quantity ची Excel File मध्ये कंपनीचे /पुरवठादाराचे /संस्थेचे नाव आवश्यक तो तपशील व दर नमुद करुन अपलोड करावयाचा आहे.**

Signed by
Sandeep Sambhaji Yadav
Date: 12-02-2025 15:22:43

(संदीप यादव )
**जिल्हा कार्यक्रम अधिकारी(मबावि)**
**जिल्हा परिषद सांगली**

( तृप्ती धोडमिसे )भाप्रसे
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सांगली**

# महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद सांगली

सन 2024-25 या वित्तीय वर्षात जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजना ( **विघयो** ) योजने अंतर्गत ग्रामीण भागातील अनुसूचीत जातीतील 6 महिने ते 6 वर्षे वयोगटातील **कुपोषीत मुला मुलींसाठी किशोरवयीन मुलींसाठी व गरोदर, स्तनदा मातांना अतिरिक्त आहार पुरविणे-मल्टी मिलेट न्युट्रीशनल कीट पुरविणे" (मल्टी मिलेट न्युट्रीशनल बिस्किटे 200 ग्राम व मल्टी मिलेट न्युट्रीशनल प्रीमिक्स 300 ग्राम असे दोन्ही मिळून 500 ग्राम कीट)**

**ड) निविदेच्या इतर अटी व शर्ती:-**

1. सशर्त निविदा विचारात घेतली जाणार नाही.
2. अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अथवा नवीन अट समाविष्ट करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांनी राखून ठेवला आहे.
3. साहीत्यांचे पुरवठा निविदेतील वर्णनानुसार एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयावर साहित्य / माल पुरवठा सुस्थितीत करणे आवश्यक राहील. तुट-फुट खराब साहीत्य / माल स्वीकारला जाणार नाहीत.
4. निविदेतील पात्र पुरवठाधारकाने पुरवठा आदेश दिल्यानंतर साहित्य / मालाचा पुरवठा न केल्यास किंवा पुरवठा आदेश घेण्यास नकार दिल्यास त्याची सुरक्षा ठेव जप्त करुन त्याचे नाव काळया यादीत समाविष्ठ करण्याबाबत कार्यवाही केली जाईल.
5. पुरवठा कालावधीत भाववाढ झाल्यास ई- निविदेतील दरा व्यतिरिक्त कोणतीही रक्कम देय असणार नाही.
6. उदयोग, उर्जा व कामगार विभागांचे शासन निर्णय दिनांक 01/12/2016 मधिल तरतुदी नुसार विहीत मुदतीत पुरवठा करणे बंधनकारक राहील.
7. उदयोग, उर्जा व कामगार विभागांचे शासन निर्णय दिनांक 01/12/2016 मधिल परिशिष्ठ - अंतर्गत 1.Risk purchase 2. Fall clause 3. Force Majeure अटी बंधनकारक राहतील.
8. आवश्यक वाटल्यास निविदाधारकाच्या उत्पादक केंद्राची तपासणी व मुल्यांकन करण्यात येईल. त्यात पात्र ठरलेल्या पुरवठाधारकांचेच व्यापारी लिफाफे उघडण्यात येईल.
9. **मल्टी मिलेट न्युट्रीशनल किटमध्ये (मल्टी मिलेट न्युट्रीशनल बिस्किटे 200 ग्राम व मल्टी मिलेट न्युट्रीशनल प्रीमिक्स 300 ग्राम असे दोन्ही मिळून 500 ग्राम कीट)** असणे आवश्यक आहे व पुरवठा करण्यात येणाऱ्या पाकिटावर साहित्याचे प्रमुख अन्नघटक व त्यातील पोषक तत्वे त्याबाबतचे सविस्तर विवरण तसेच महिला व बालविकास विभाग अशी प्रिंट असणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक पाकिटावर Not For Sale , Gov. Supply. Only, Manufacturing Date आणि Expiry Date ई. आवश्यक बाबी नमूद करणे बंधनकारक राहील.
10. **मल्टी मिलेट न्युट्रीशनल किटचा** खाण्यायोग्य कालावधी प्रत्यक्ष पुरवठा केल्यानंतर किमान 4 महिने असणे आवश्यक राहील. तसेच सदरचे पॅकिंग मटेरियल हे Poly Bag Food Grade Standard मध्ये असणे आवश्यक आहे व सदरचा पुरवठा हवाबंद (Air Tight) स्वरुपात करणे बंधनकारक राहील.
11. निविदाधारकाने साहित्य हे नमूद प्रमाणानुसार सांगली जिल्ह्यातील सर्व एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयात पोहोच करणे बंधनकारक राहील.
12. निविदाधारकाने नमुद दरामध्ये दिनांक 01 जुलै 2017 पासून लागु झालेल्या वस्तु व सेवा कर कायदा (जीएसटी) इतर प्रचलित कर, शुल्क आणि वाहतूक खर्च या सर्व करासहित वस्तुंची किंमत एकत्रित नमुद करावेत सर्व परिमाण वा दर पुर्ण रुपयात दयावेत. वेगवेगळे दर नमूद करू नये.
13. निविदाधारकांने सादर केलेले दर हे शासन निर्णयानुसार निविदा स्विकृतीच्या दिनांकापासून 6 महिन्यापर्यंत बंधनकारक राहतील.
14. निविदा खरेदीची रक्कम अंदाजित आहे. यामध्ये कुठल्याही योजनेच्या तरतुदीत वाढ अथवा घट झालेनुसार खरेदी कमी-अधिक रक्कमेची करणेत येईल आणि याबाबतचे सर्वाधिकार खरेदी अधिकारी यांना राहतील.
15. नामंजूर ई- निविदाबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
16. निविदेतील साहीत्यांचे प्रसिध्द करणेत आलेले विनिर्देशानुसार शासन दरकरार अस्तित्वात आल्यास किंवा शासनाने खरेदी धोरणात काही बदल केल्यास किंवा मुख्य कार्यकारी आधिकारी यांनी निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्यावर रदद करणेचे ठरविल्यास असे आधिकार राखुन ठेवण्यात आलेले आहेत.
17. देयकाचे प्रदान पुरवठा आदेशातील विनिर्देशानुसार साहित्य प्रकल्प स्तरावर पुरवठा आदेशातील नमूद ठिकाणापर्यंत पुरवठा सुस्थितीत केल्याच्या पोहोच पावत्या दोन प्रतीत या कार्यालयात सादर करण्यात यावे.
18. साहित्य पुरवठा सुस्थितीत झालेल्या बाबतच्या पोहोच पावत्या व देयक कार्यालयात सादर केल्यानंतर पुरवठा करण्यात आलेल्या मालाचा नमुना NABL/शासकीय प्रयोगशाळेत पाठविण्यात येईल व त्यात पात्र ठरल्यानंतरर देयकाची रक्कम अदा करणेत येईल.
19. निविदेतील अटी व शर्ती याबाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांचा निर्णय अंतिम राहील. त्याबाबतचे न्यायालयीन कार्यक्षेत्र सांगली राहिल यांची नोंद सर्व निविदाधारकांनी घ्यावी.
20. उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक 01 डिसेंबर 2016 मधील मार्गदर्शक सूचना (5.7.2) नुसार खरेदी तक्रार निवारण करण्याची कार्यपद्धतीचा अवलंब केला जाईल.
21. नामंजूर ई-निविदाबाबत कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.

2. जिल्हा परिषदेस आवश्यकता वाटल्यास उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासननिर्णय दिनांक 01 डिंसेबर 2016 मधील नियम क्र. 3.3.2 नुसार पुनर्प्रत्ययी आदेशाची कार्यवाही करणेत येईल.

23. महाराष्ट्र शासन उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई शासन निर्णय दिनांक 01/12/2016 मधील प्रकरण 4 मुद्दा क्रमांक 4.6 (ड) नुसार सुक्ष्म, लघु व मध्यम उदयोग विकास अधिनियम 2006 अंतर्गत उत्पादक म्हणुन नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म, लघु व मध्यम उदयोग मध्यवर्ती भांडार संघटना याचेकडे नोंदणीकृत उदयोगांना, उत्पादक, पुरवठादाराला बयाना शुल्क रक्कम भरण्यापासुन सुट देण्यात येत आहे. परंतु तसे नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

Signed by
Sandeep Sambhaji Yadav
Date: 12-02-2025 15:23:49

(संदीप यादव)
**जिल्हा कार्यक्रम अधिकारी(मबावि)**
**जिल्हा परिषद सांगली**

Signed by
Trupti Ankush Dhodmise
Date: 14-02-2025 10:42:30

( तृप्ती धोडमिसे )भाप्रसे
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सांगली**

## ई-निविदेबाबत सर्वसाधारण सूचना

वरील कामाची निविदा प्रक्रिया संकेतस्थळावर ई निविदा ऑनलाईन करणेत येईल या निविदे संबधी यापुढील सर्व सुचना / शुद्धीपत्रक www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच निविदा बाबतची सर्व कार्यपद्धती शासन निर्णय दिनांक 1 डिसेंबर 2016 अन्वये राहील.

1. पूर्ण माहिती भरलेले तांत्रिक लिफाफा क्र.1 ऑनलाईन पद्धतीने www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर महिला व बालविकास विभाग, जि.प. सांगली येथे उघडल्या जातील.
2. निविदा फी बयाना रक्कम इ. संकेतस्थळावरील सुचनेनुसार ऑनलाईन पद्धतीने भरणा करण्यात यावा.
3. सदर निविदेच्या अटी व शर्तीमध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांच्या व रक्कम भरल्याची पावती स्कॅन केलेल्या प्रती तांत्रिक लिफाफा क्र. 1 मध्ये pdf format मध्ये upload करणे आवश्यक आहे.तसेच इतर आवशयक माहिती (other Imp document ) User A/C चे mydpace/ Account मधून सादर करावे
4. सदर कागदपत्रे व रक्कम भरल्याची पावती बाबत पूर्तता न झाल्यास निविदा अवैध ठरवली जाईल.
5. निविदाधारकाचे ऑनलाईन निविदा सादर केल्यावर प्रत्यक्षात लिफाफा क्र. 1 मध्ये स्कॅन केलेल्या प्रती कार्यालयास सादर करण्याची आवशक्यता नाही. तथापि तांत्रिक छाननी साठी आवश्यकता भासल्यास कार्यालय निविदाधारकांना मूळ प्रती सादर करण्याबाबत सुचित करेल. तसेच सदरच्या प्रती ह्या कार्यालयास सादर करण्यामध्ये ईतर निविदाधारकांच्या बाबतीत अडथळा निर्माण केल्यास अशा निविदाधारकांचे नाव जि.प. च्या काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येईल. तसेच संबाधिताचे ई-निविदा प्रक्रियेतील ऑनलाईन खाते बंद (block) करणे बाबत संबंधित नोडल अधिकारी (ई-निविदा) यांना कळविण्यात येईल.
6. निविदेसंदर्भात तक्रार करावयाची असल्यास, तक्रार अर्जासोबत रू. 50,/- चा डिमांड ड्राफ्ट मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद, सांगली यांच्या नावे शुल्क म्हणुन जमा करावा लागेल. सदर शुल्क तक्रारदाराचे म्हणणे खरे असल्याचे आढळून आल्यास परत करणेत येईल अन्यथा सदरचे शुल्क जप्त करण्यात येईल.
7. पात्र निविदाधारकाचे वित्तीय लिफाफा क्र. 2 उघडणेची वेळ व दिनांक पात्र निविदाधारकाचे email/sms द्वारे संकेतस्थळामार्फत कळविण्यात येईल. तसेच उघडणे पासून पुरवठा आदेश देणेपर्यंतचे सर्व प्रक्रिया संकेतस्थळावर होणार असल्याने याबाबत निविदाधारक आपल्या user a/c मधून अद्यावत माहिती पाहू शकतात. यासाठी कार्यालयाशी अनावश्यक संपर्क करू नये.
8. कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा त्यातील कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांनी राखून ठेवलेला आहे.
9. तांत्रिक छाननी, वित्तीय छाननी मध्ये बाद झालेल्या निविदा धारकाची बयाना रक्कम ऑनलाईन पद्धतीने संकेतस्थळाद्वारे परत होईल. सदर बयाना रक्कम विहित वेळेत परत न मिळाल्यास संकेतस्थळावरील सपोर्ट टीमशी संपर्क साधावा.

10. उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक -2024/ प्र.क्र.82/ भाग –III / उद्योग -1 दिनांक 01/12/2016 नुसार पुरवठा रकमेच्या 3 % अनामत रक्कम म्हणून पुरवठादाराकडून भरून घेनेत येईल. सदर रक्कम पुरवठा तसेच लेखा परिक्षण पूर्ण झाल्यावर पुरवठा साहित्याबाबत आक्षेप न निघाल्यास सदर रक्कम पुरवठादारास अदा करणेत येईल याची नोद घ्यावी.

Signed by
Sandeep Sambhaji Yadav
Date: 12-02-2025 15:21:46

**जिल्हा कार्यक्रम अधिकारी(मबावि)**
**जिल्हा परिषद सांगली**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सांगली**

| Schedule A | | | |
|---|---|---|---|
| **मल्टी मिलेट न्युट्रीशनल किटचे घटक (स्पेसिफिकेशन)** सन 2024-25 या वित्तीय वर्षात जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजना ( **विघयो** ) योजने अंतर्गत ग्रामीण भागातील अनुसूचीत जातीतील 6 महिने ते 6 वर्षे वयोगटातील **कुपोषीत मुला मुलींसाठी किशोरवयीन मुलींसाठी व गरोदर, स्तनदा मातांना अतिरिक्त आहार पुरविणे-मल्टी मिलेट न्युट्रीशनल कीट पुरविणे" (मल्टी मिलेट न्युट्रीशनल बिस्किटे 200 ग्राम व मल्टी मिलेट न्युट्रीशनल प्रीमिक्स 300 ग्राम असे दोन्ही मिळून 500 ग्राम कीट)** | | | |
| | | जीवनसत्वे क्षार व सुक्ष्म पोषक तत्वाचे उणीव भरुन काढणेसाठी पुरविण्यात येणा-या आहारात किमान आवश्यक असलेली जिवनसत्वे क्षार व सुक्ष्म पोषक तत्वाचे प्रमाण | |
| **अ.क्र** | **सुक्ष्म पोषक तत्वे** | **प्रमाण** | **युनिट** |
| 1 | उष्मांकक (kcal) | 415 | Kcal/100gm |
| 2 | प्रथिने(g) | 9.70 | % |
| 3 | लोह (mg) | 0.45 | Mg/100 gm |
| 4 | कॅलशियम (mg) | 25 | Mg/100 gm |
| 5 | थायमीन (mg) | 0.3 | Mg/100 gm |
| 6 | रायबोफ्लेवीना (mg) | 8 | Mg/100 gm |
| 7 | नायसिन (mg) | 0.4 | Mg/100 gm |
| 8 | विटामीन - सी (mg) | 220 | Mg/100 gm |
| 9 | फोलीक ऍसिड (mg) | < 0.05 | Mg/100 gm |
| 10 | फायवरर | 2.5 | % |
| 11 | कार्बोहायड्रेस | 72 | % |
| 12 | कॅरोटीन(A) | 115 | Mg/100 gm |
| 13 | विटामीन (D) | <0.05 | Mg/100 gm |
| 14 | विटामीन (E) | <0. 2 | Mg/100 gm |
| 15 | विटामीन (K) | <0.05 | Mg/100 gm |
| 16 | विटामीन (B-6) | 17 | Mg/100 gm |
| 17 | विटामीन (B-12) | 4.5 | Mg/100 gm |
| 18 | पॅटॉथेनिक ऍसिड (B-5) | 48 | Mg/100 gm |
| 19 | बायोटीन (B-7) | 175 | Mg/100 gm |
| 20 | पोटॅशियम | 880 | Mg/100 gm |
| 21 | फॉस्फरस | 90 | Mg/100 gm |
| 22 | सोडीयम | 30 | Mg/100 gm |
| 23 | मॅग्नेशियम | 25 | Mg/100 gm |
| 24 | झिंकक | <0.5 | Mg/100 gm |
| 25 | कॉपर | 0.15 | Mg/100 gm |
| 26 | आयोडीन | <0.1 | Mg/100 gm |
| 27 | सॅलेनिअम | <0.05 | Mg/100 gm |
| 28 | N-6 फॅटी ऍसिडस | 2 | Mg/100 gm |
| 29 | N-6 फॅटी ऍसिडस | 0.05 | Mg/100 gm |

Signed by
Sandeep Sambhaji Yadav
Date: 12-02-2025 15:24:36
(संदीप यादव )
**जिल्हा कार्यक्रम अधिकारी(मबावि)**
**जिल्हा परिषद सांगली**

Signed by
Trupti Ankush Dhodmise
Date: 14-02-2025 10:41:53
( तृप्ती धोडमिसे )भाप्रसे
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सांगली**